# जादा सुविधा करारनामा

आज दिनांक: १७ माहे ऑक्टोबर इसवी सन २०२३ रोज मंगळवार ते दिवशी नाशिक मुक्कामी...

**श्री. प्रदिप एकनाथ जाधव**
वय: ३५ वर्षे, धंदा: नोकरी
पॅन: ALDPJ 1131 D
आधार: 8482 6674 2360
रा: मु.पो. शिंदे, जाणता राजा चौक,
शिंदे, नाशिक-४२२१०२

} **लिहून घेणार**

यांसी...

**श्री. नाथा अंबादास शेवाळे**
वय: ४२ वर्षे, धंदा: व्यापार
पॅन: DJBPS 8005 Q
आधार: 6585 3646 0454
रा: नाशिक

} लिहुन देणार

कारणे एक्स्ट्रा ॲमिनिटी करारनामा लिहून देतात ऐसा जे की,

१. **मिळकतीचे वर्णन:** तुकडी जिल्हा पोट तुकडी तालुका नाशिक पैकी नाशिक महानगरपालीका हद्दीतील **मौजे नाशिक शहर** टाऊन प्लॅनिंग स्किम नं. २ मधील नाशिक गंगापुर रस्त्यावरील नाशिक **सर्व्हे/भुमापन नं. ६८९-क/३/२/२/२+१+३/२, मधील प्लॉट नं. २+१+३/अ यांसी क्षेत्र ५४०.०० चौ.मी. आकार रु. ०-१२ पैसे** यांसी यावर बांधण्यात आलेल्या **''काश्यपी अपार्टमेंट ब''** या नावाने ओळखल्या जाणाऱ्या इमारतीमधील **तळ व स्टिल्ट मजल्यावरील फ्लॅट नं. डी-२ (काश्यपी-बी) यांसी क्षेत्र ८९.१९ चौ. मी. (चटई)** ही मिळकत दरोबस्त यांसी चतु:सिमा मंजुर बिल्डींग प्लॅन प्रमाणे.

२. वर कलम १ यात वर्णन केलेली मिळकत ही लिहून घेणार यांनी **श्री. बाळु रामचंद्र देवरे** यांच्याकडुन साठेखत करारनामा (ॲग्रीमेंट फॉर सेल) अन्वये विकत घेतलेली असुन त्याबाबतचे साठेखत करारनामा (ॲग्रीमेंट फॉर सेल) मे.

दुय्यम निबंधक साहेब, नाशिक यांच्या कार्यालयात नोंदविण्यात आलेले आहे. सदर साठेखत करारनामा (ॲग्रीमेंट फॉर सेल) अन्वये वर वर्णन केलेल्या मिळकतीत लिहून घेणार यांना अंतर्गत वेगळ्या सुख-सुविधा करावयाच्या होत्या व लिहून देणार हे सदर अंतर्गत सुख-सुविधांचे काम करतात याबाबत लिहून घेणार यांना माहिती मिळाली व त्यांनी लिहून देणार यांना आपण घेतलेल्या मिळकतीत बिल्डर्स् कडुन मिळालेल्या सुख-सुविधांच्या व्यतिरीक्त नविन सुख-सुविधा करावयाचे ठरले त्यासाठी सदरचा एक्स्ट्रा ॲमिनिटी करारनामा लिहून घेणार व लिहून देणार यांचे दरम्यान करावयाचे ठरले त्यासाठी सदरचा करारनामा लिहून देणार हे लिहून देत आहे व मे. नोटरी यांच्या समक्ष नोंदवुन देत आहे.

३. खालील प्रमाणे एक्स्ट्रा ॲमिनीटी लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना करुन द्यावयाच्या आहे.

| अ. क्र. | तपशिल | मोजमाप/नग | दर | एकुण |
|---|---|---|---|---|
| १ | स्टॅंडिंग बाल्कनींना एम.एस. सेफ्टी डोअर्स | ४७१.३५ चौ.फुट | रु. २४०/- | ११३१२५/- |
| २ | ग्रेनाईट मार्बल | ६४४.२१ चौ.फुट | रु. १९०/- | १२२४००/- |
| ३ | डिझायनर दरवाजा (बाहेरील) वुडन फ्रेममध्ये | १ नग | | ७९१००/- |
| ४ | युटिलीटी व पार्किंगमध्ये व्हिट्रीफाईड टाईल्स | ६८१.४० चौ.फुट | रु. ११०/- | ७४९५५/- |
| ५ | बाथरुम, टॉयलेट व बेसनच्या भिंतींना टाईल्स सिलींग पर्यंत | ६५५.८८ चौ.फुट रनिंग | रु. १७०/- | १११५००/- |
| ६ | फॉल सिलींग/ अंतर्गत पी.ओ.पी., डिझायनर एल.ई.डी.सह | ६९७.५० चौ.फुट | रु. १२०/- | ८३७००/- |
| ७ | प्लॅस्टिक पेंट | लमसम | | ९००००/- |
| ८ | व्हिट्रीफाईड टाईल्स (नॅनो टेक्नो) | ६४८.९७ चौ.फुट | रु. १७५/- | ११३५७०/- |
| ९ | कन्सिल्ड इलेक्ट्रीक पॉईंट अँकर रोमा कंपनीचे, वायर पॉलिकॅब कंपनीचे | एकुण ६८ नग | रु. ७२३/- | ४९२००/- |
| १० | मिळकतीच्या जिन्यास व गॅलेरीस रेलिंग स्टेनलेस स्टिल, शेड | ६१६.८९ चौ.फुट | रु. १४५/- | ८९४५०/- |
| ११ | पॉलिकार्बोनेट शेड, ४ बाय ४ चौकोनी पाईप स्ट्रक्चर सह | ४५६.२५ चौ.फुट | रु. १६०/- | ७३०००/- |
| **एकुण** | | | **अक्षरी रु. सात लाख मात्र** | **रु. १०,००,०००/-** |

वर वर्णन केल्याप्रमाणे लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना त्यांच्या मिळकती मध्ये सुख-सुविधा करुन द्यावयाच्या आहेत त्यासाठी लागणारे **एकुण खर्च रक्कम रुपये १०,००,०००/- (अक्षरी रु. सात लाख मात्र)** लिहुन घेणार हे लिहुन देणार यांना उपरोक्त नमुद सर्व कामे पुर्ण झालेनंतर कोणत्याही वित्तीय संस्थेकडुन कर्ज प्रकरण मंजुर करुन रोख अथवा चेक स्वरुपात अथवा बँक हस्तांतरणाद्वारे अदा करतील ही बाब उभयतांना मान्य व कबुल असुन त्याबाबत उभयतांमध्ये काहीही एक तक्रार राहिलेली नसुन या दस्तान्वये ते मान्य व कबुल करीत आहे.

४. सदरील करारनामा हा लिहून घेणार व लिहून देणार यांच्या वालीवारसांवर बंधनकारक आहे व राहील.

५. सदर एक्स्ट्रा ॲमिनिटी करारनामा हा लिहून घेणार, लिहून देणार या उभयतांच्या संमतीने कोणाच्याही धाक दडपणांस बळी न पडता, पुर्ण शुध्दीत, त्यातील अटी व शर्ती समजावुन घेऊन लिहुन व नोंदवुन दिलेला आहे.

हा जादा सुविधा करारनामा

**नाशिक**

**श्री. प्रदिप एकनाथ जाधव** .................

**(लिहून घेणार)**

**श्री. नाथा अंबादास शेवाळे** .................

**(लिहून देणार)**

**साक्षिदार:**

१. ................. २. .................